RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष २, अंक ३१(३)] सोमवार, ऑगस्ट २२, २०१६/श्रावण ३१, शके १९३८ [पृष्ठे २, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ४५**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९.—** महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम. . . . . . . . . . . | १-२ |

दिनांक २२ ऑगस्ट २०१६ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**प्रकाश हिं. माळी,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

**सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९.**

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **“ महाराष्ट्र शासन राजपत्रात ”** दिनांक २२ ऑगस्ट २०१६ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

१९६६ चा महा. ४१.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सदुसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :–

संक्षिप्त नाव.

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (चौथी सुधारणा) अधिनियम, २०१६, असे म्हणावे.

१९६६ चा महा. ४१.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम २९५ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (यात यापुढे ज्याचा निर्देश “ उक्त संहिता ” असा करण्यात आला आहे) याच्या, कलम २९५ मध्ये, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल आणि ते उक्त संहिता अंमलात आल्याच्या दिनांकापासून जादा दाखल करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल :–

" परंतु, राज्य शासनाकडे निहित असलेल्या जमिनींचे किंवा किनाऱ्यालगतच्या प्रदेशांचे, राज्य शासनाने किंवा जिल्हाधिकाऱ्याने कोणत्याही मुदतीसाठी दिलेले जे पट्टे या संहितेच्या प्रारंभाच्या दिनांकास किंवा त्या दिनांकापूर्वी अस्तित्वात होते किंवा जे, त्यानंतर दिलेले होते असे सर्व पट्टे हे, जिल्हाधिकाऱ्याने निष्पादित केलेल्या पट्टालेखात किंवा पट्टाकरारात किंवा इनामपत्रात नमूद केलेल्या शर्ती असतानासुद्धा, पुढील शर्तींच्या सुद्धा अधीन असतील :—

(एक) शासनाकडे निहित असलेल्या पट्ट्याने दिलेल्या जमिनींच्या किंवा किनाऱ्यालगतच्या प्रदेशांच्या संबंधातील पट्टेदारी हक्क हे, केवळ जिल्हाधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीने, शासनाकडून आदेशाद्वारे वेळोवेळी विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा दरांनी अनर्जित उत्पन्नापोटी असे पट्टामूल्य आणि हस्तांतरणशुल्क किंवा आकार यांचे प्रदान केल्यावर आणखी अभिहस्तांकित किंवा हस्तांतरित करता येतील.

(दोन) उप-खंड (एक) च्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन केल्यास, अशा पट्टेदारी हक्कांचा पट्टेदार किंवा हस्तांतरक हा, असे पट्टामूल्य आणि हस्तांतरण शुल्क किंवा आकार यांबरोबरच शासनाकडून आदेशाद्वारे वेळोवेळी विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा दरांनी आणखी शास्तीदेखील प्रदान करण्यास पात्र असेल.".

विधीग्राह्यीकरण. **३.** उक्त संहिता किंवा त्याखाली करण्यात आलेले कोणतेही नियम यांमध्ये किंवा कोणत्याही न्यायालयाचा, न्यायाधिकरणाचा किंवा इतर कोणत्याही प्राधिकरणाचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा आदेश यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, शासनाने, उक्त संहिता अंमलात येण्याच्या दिनांकापासून सुरू होणाऱ्या आणि महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (चौथी सुधारणा) अधिनियम, २०१६ याच्या प्रारंभाच्या दिनांकास (यात यापुढे ज्याचा निर्देश "सन २०१६ च्या सुधारणा अधिनियमाचा प्रारंभाचा दिनांक" असा करण्यात आला आहे) संपणाऱ्या कालावधीत, जिल्हाधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीने किंवा पूर्वपरवानगीशिवाय, शासनाकडे निहित असलेल्या पट्ट्याने दिलेल्या जमिनींच्या किंवा किनाऱ्यालगतच्या प्रदेशांच्या संबंधातील पट्टेदारी हक्कांच्या पट्टेदाराने किंवा हस्तांतरकाने अशा पट्टेदारी हक्कांच्या आणखी अभिहस्तांकनावर किंवा हस्तांतरणावर, अनर्जित उत्पन्नापोटी असे पट्टामूल्य आणि हस्तांतरण शुल्क किंवा आकार किंवा शास्ती यांची शासनाने केलेली आकारणी, मागणी व वसुली आणि त्याबद्दल शासनाने केलेली कोणतीही कारवाई ही, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (चौथी सुधारणा) अधिनियम, २०१६ द्वारे सुधारणा केलेल्या उक्त संहितेअन्वये वैधरीतीने केलेली आकारणी, मागणी, वसुली असल्याचे किंवा केलेली कारवाई असल्याचे मानण्यात येईल आणि ती नेहमीच वैधरीतीने केलेली आकारणी, मागणी, वसुली असल्याचे किंवा केलेली कारवाई असल्याचे मानण्यात येईल ; आणि त्यानुसार, जिल्हाधिकाऱ्याने असे पट्टामूल्य आणि हस्तांतरण शुल्क किंवा आकार किंवा शास्ती यांची आकारणी, मागणी, वसुली किंवा करावयाची कारवाई यांबद्दल, सन २०१६ च्या सुधारणा अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी, उक्त संहितेमध्ये तरतुदी करण्यात आल्या नव्हत्या या कारणावरून, कोणत्याही न्यायालयात किंवा कोणत्याही न्यायाधिकरणापुढे किंवा अन्य प्राधिकरणापुढे कोणताही दावा, खटला किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही. उक्त संहिता अंमलात आल्याच्या दिनांकापासून अशा रीतीने आकारणी, मागणी आणि वसूल केलेले असे कोणतेही पट्टामूल्य आणि हस्तांतरण शुल्क किंवा आकार किंवा शास्ती यांचा परतावा करण्यासाठी किंवा केलेल्या कोणत्याही कारवाईसाठी कोणत्याही न्यायालयात किंवा कोणत्याही न्यायाधिकरणापुढे किंवा अन्य प्राधिकरणापुढे कोणताही दावा, खटला किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही किंवा चालवण्यात येणार नाही किंवा चालू ठेवता येणार नाही.

२०१६ चा महा. २९.

२०१६ चा महा. २९.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

RNI No. MAHENG/2009/35528

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग आठ

वर्ष २, अंक ५६(३)] सोमवार, ऑगस्ट २२, २०१६/श्रावण ३१, शके १९३८ [ पृष्ठे २, किंमत : रुपये २७.००

असाधारण क्रमांक ८९

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).**

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Land Revenue Code (Fourth Amendment) Act, 2016 (Mah. Act No. XXIX of 2016), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

PRAKASH H. MALI,
Principal Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT No. XXIX OF 2016.

*(First published, after having received the assent of the Governor in the "Maharashtra Government Gazette", on the 22nd August 2016).*

An Act further to amend the Maharashtra Land Revenue Code, 1966.

Mah. XLI of 1966. WHEREAS it is expedient further to amend the Maharashtra Land Revenue Code, 1966, for the purposes hereinafter appearing ; it is hereby enacted in the Sixty-seventh Year of the Republic of India as follows :—

Short title. **1.** This Act may be called the Maharashtra Land Revenue Code (Fourth Amendment) Act, 2016.

Amendment of section 295 of Mah. XLI of 1966. Mah. XLI of 1966. **2.** To section 295 of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (hereinafter referred to as "the said Code"), the following proviso shall be added and shall be deemed to have been added with effect from the date of commencement of the said Code, namely :—

"Provided that, all leases granted by the State Government or the Collector of the land or foreshore vested in the Government for

whatever term, which were in existence on or before the date of commencement of this Code or were granted thereafter, shall notwithstanding the conditions stipulated in such lease-deeds or lease-agreements or Grant orders executed by the Collector, be also subject to the following conditions, namely :—

*(i)* Leasehold rights in respect of the lands or foreshore vested in the Government given on lease may be further assigned or transferred only with the prior permission of the Collector on payment of such premium on account of unearned income and transfer fees or charges, at such rates as may be specified by the Government by an order, from time to time.

*(ii)* In the case of any contravention of the provisions of sub-clause *(i)*, the lessee or transferor of such leasehold rights, shall be liable to pay penalty in addition to such premium and transfer fees or charges, at such rates as may be specified by the Government by an order, from time to time.".

Validation **3.** Notwithstanding anything contained in the said Code or in any rules made thereunder or in any judgment, decree or order of any court, tribunal or any other authority, any levy, demand and collection of premium on account of unearned income and transfer fees or charges or penalty by the Government during the period commencing from the date of coming into force of the said Code and ending on the date of commencement of the Maharashtra Land Revenue Code (Fourth Amendment) Act, 2016 (hereinafter referred to as "the date of commencement of the Amendment Act of 2016"), on further assignment or transfer of leasehold rights by the lessee or transferor of such leasehold rights in respect of the lands or foreshore vesting in the Government given on lease, with or without prior permission of the Collector and any action taken by the Government therefor, shall be deemed to have been validly levied, demanded, collected or taken and shall be deemed always to have been validly levied, demanded, collected or taken under the said Code, as amended by the Maharashtra Land Revenue Code (Fourth Amendment) Act, 2016 and, accordingly, no suit, prosecution or other legal proceedings shall lie in any court or before any tribunal or other authority on the ground that, the provisions of the said Code, prior to the date of commencement of the Amendment Act of 2016, did not provide for levy, demand and collection of such premium and transfer fees or charges or penalty or action by the Collector. No suit, prosecution or other legal proceedings shall lie or be maintained or continued in any court or before any tribunal or other authority, for the refund of any such premium and transfer fees or charges or penalty so levied, demanded, collected or for any action taken with effect from the date of coming into force of the said Code.

Mah. XXIX of 2016.

Mah. XXIX of 2016.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.